**आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,**

**आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय,**

**कुळगांव-बदलापूर**

**राष्ट्रीय सेवा योजना** व **राज्यशास्त्र** विभाग **२०२१-२२ कार्यक्रम अहवाल**

# लसीकरण मोहीम

महाराष्ट्र शासनाच्या मिशन युवा स्वस्थ कोविड-१९ लसीकरण धोरणाला अनुसरून आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २५/१०/२०२१ ते २८/१०/२०२१ आणि ०१/११/२०२१ या पाच दिवसाच्या कालावधीत लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २५/१०/२०२१ रोजी सकाळी आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे विश्वस्थ मा. श्री. नंदकिशोर पातकर, मा. श्री. तुषार आपटे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार व प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे आणि बदलापूर नगर परिषदेचे आरोग्य कर्मचारी यांच्या उपस्थितीत या लसीकरण मोहिमेची सुरवात झाली. या लसीकरण मोहिमेचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थी व पालकांनी घेतला. या पाच दिवसाच्या लसीकरण अभियानमध्ये एकूण ३७२ विद्यार्थी व पालकांचे लसीकरण झाले. या लसीकरण मोहिमेकरीता महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व बदलापूर नगरपरिषदेचे आरोग्य कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.

राष्ट्रीय सेवा योजना
(कार्यक्रम अधिकारी)

# मतदार नाव नोंदणी कार्यक्रम

भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार दि. १९/११/२०२१ रोजी मतदार नाव नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे बदलापूर नगरपरिषदेचे मा. श्री. कसबेकर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आत्माराम बांदल आपले प्रा. डॉ. संदीप भेले हे उपस्थित होते. या मतदार नोंदणी अभियानात महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घेतला व २७ विद्यार्थ्यांनी आपली पात्र मतदार म्हणून नाव नोंदणी केली.

N S S व राज्यशास्त्र विभाग

# आपले संविधान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

संविधान जागृती सप्ताह अंतर्गत आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व IQAC आणि सामाजिक समरसता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आपले संविधान या विषयावर मंगळवार दि. २३/११/२०२१ रोजी संविधानाचे अभ्यासक मा. श्री. नागेश धोंगडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी आपले संविधान किती महत्वपूर्ण असून ते तरुणांनी आत्मसात करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले, तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. श्री. नागेश धोंगडे यांनी भारतीय संविधानाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समिती व मसुदा समिती कशा महत्वपूर्ण ठरल्या याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी सर्वश्रेष्ठ राज्यघटना कशी आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. संविधानाकडे एक कायद्यांचे पुस्तक म्हणून न पाहता ती सर्वअंगाने कशी उपयुक्त आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. देशाच्या राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या संविधानाच्या अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे असे भाष्य त्यांनी केले. देशाचा जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तीने संविधान समजावून घेतले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले हा कार्यक्रम ऑफलाईन व ऑनलाईन असा दोन्ही पद्धतीत घेण्यात आला. या कार्यक्रमात १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आत्माराम यांनी केले तर मराठी विभागाचे प्रा. डॉ. संदीप भेले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

N S S कार्यक्रम अधिकारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन

भारतात ६ डिसेंबर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन असतो ज्याचे औचित्य साधून आदर्श महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सोमवार दि. ०६/१२/२०२१ रोजी संविधान प्रचारक मा. माधुरी सोनावणे यांचे संविधान या विषयावर व्याख्यान आयोगाने करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली राज्यघटना किती महत्वपूर्ण असून ती आज कशी उपयुक्त ठरत आहे असे मत व्यक्त केले. तर मा. माधुरी सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राज्यघटना हा केवळ राजकीय ग्रंथ नसून आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रात संविधान किती महत्वपूर्ण आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. न्यायालयीन निवाडे हे घटनेच्या आधारे दिले जातात व नागरिकांना प्राप्त झालेले अनेक प्रकारचे हक्क व स्वातंत्र्य हे संविधानाने दिले आहेत, हे विद्यार्थ्यांना सांगितले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्या पासून ते आजपर्यंत देशाने जी भरीव प्रगती केली आहे, ती राज्यघटनेमुळेच केली आहे. व्यक्तिमत्व विकासाची अनेक क्षितिजे आपण पूर्ण करू शकलो त्याचे कारण संविधान आहे, असे भाष्य त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप भेले यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आत्माराम बांदल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

N S S व राज्यशास्त्र विभाग

# एच आय व्ही-एड्स जनजागृती कार्यक्रम

दि. १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने आदर्श महाविद्यालयात शनिवार दि. ११/१२/२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'एचआयव्ही-एड्स जनजागृती' या विषयावर मा. श्री अशोक देशमुख जिल्हा पर्यवेक्षक ठाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
या कर्यक्रमाच्या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी विद्यार्थ्यांना एड्स या विषाणू बाबत माहिती देताना प्रामुख्याने या आजारा बाबत समाजाची मानसिकता बदलली पाहिजे व एड्स रुग्णाला सामाजिक सहकार्याची गरज आहे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. श्री. अशोक देशमुख यांनी विद्यार्थ्यांना एड्स म्हणजे काय याची माहिती दिली. व विवाह पूर्व एड्स चाचणी करणे किती उपयुक्त आहे, हे पटवून दिले. आपल्या ठाणे जिल्ह्यामध्ये एड्स रुग्णाची संख्या किती आहे हे देखील सांगितले. एड्स हा आजर कशामुळे होतो, आणि झाला तर त्या वरील उपाय काय याची देखील माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच शासनाच्या वतीने एड्स रुग्णांना कोणत्या सुविधा पुरविल्या जातात याचीही माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली शिवाय सामाजिक संस्थांची या आजाराबाबत काय भूमिका आहे, याचेही मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. हा आजार झाल्यास न घाबरता योग्य उपचार पद्धती व सामाजिक पाठींबा असल्यास आजाराचे रुग्ण बरे होण्यास मदत होते असे भाष्य त्यांनी केले.
हा कार्यक्रम ऑफलाईन व ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतीमध्ये घेण्यात आला या कार्यक्रमास एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आत्माराम बांदल यांनी केले तर उपस्थितांचे आभार मराठी विभागाचे प्रा. डॉ. भेले यांनी मानले.

N S S कार्यक्रम अधिकारी

# महिला सक्षमीकरण व अंमली पदार्थांच्या सेवनापासून तरुणांना परावृत्त करणे या कार्यक्रमाचे आयोजन

बदलापूर येथील आदर्श व कला वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०५/०१/२०२२ रोजी **महिला सक्षमीकरण व अंमली पदार्थांच्या सेवनापासून तरुणांना परावृत्त करणे.** या विषयावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तत्पूर्वी जेष्ठ समाजसेविका अनाथांची माई सिंधुताई सकपाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून करण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्यानी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात स्त्री सक्षमीकरणा बाबत अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व अंमली पदार्थाच्या आहारी न जाता तरुणांनी आपले आरोग्य सद्दढ राखले पाहिजे असे ही भाष्य केले. या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थाचे सेवन न करण्याची '**शपथ**' प्राचार्याच्या उपस्थित घेतली. या कार्यक्रमामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन असे एकूण ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. संदीप भेले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. आत्माराम बांदल यांनी मानले.

N.S.S. कार्यक्रम अधिकारी

# आदर्श महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या महिला विकास मंच व राष्ट्रीय सेवा योजना आणि विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी, शाखा बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन पद्धतीने आज मंगळवार दि. ११.०१.२०२२ रोजी सकाळी११.०० वाजता स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात 'स्त्री किती स्वतंत्र? किती  परतंत्र?' या विषयावर वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पाच गट सहभागी झाले होते.  या स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे समाजातील विविधस्तरावरील स्थान यावर विद्यार्थ्यांनी आपले परखड विचार मांडले .तर महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. वैदेही दप्तरदार मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी वाद-विवाद स्पर्धेतील कौशल्य कशा प्रकारे अवगत करावे; आपली भूमिका मांडत असताना स्पष्ट उच्चार आणि मराठी भाषेच्या व्याकरणाचे ज्ञान असावे असे सांगीतले.  तर विवेकानंद केंद्राच्या मा. मीनाताई देशपांडे यांनी विद्यार्थ्यांनी आपले सामर्थ्य ओळखून आपल्या कमतरतेवर मात केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच या स्पर्धेला परीक्षक म्हणून उपस्थित असलेल्या विवेकानंद केंद्राच्या मा. विद्याताई साठे व मा. अलकाताई जहागीरदार यांनी निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या स्पर्धेत प्रथम क्र. कु. राम चव्हाण व कु. मयुरी लोखंडे (तृतीय वर्ष इतिहास विभाग) यांना तर द्वितीय क्र. कु. संचेती चेंडगे आणि कु. धनश्री बेर्डे (FYBAF) यांना प्राप्त झाला.

याप्रसंगी  महाविद्यालयातील सुमारे ५१ विद्यार्थी-रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप भेले यांनी केले.  तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व राज्यशास्त्राचे प्रा. आत्माराम बांदल यांनी मानले.

N.S.S. कार्यक्रम अधिकारी

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने निबंध व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

भारतात २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून आदर्श महाविद्यालय व कुळगाव बदलापूर नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १०. वाजता आदर्श महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेसाठी मी नव्या युगाचा/ युगाची मतदार, मी माझे मत विकणार नाही, मी मतदानाचा हक्क बजावणार, सोहळा लोकशाहीचा जागर मताधिकाराचा हे विषय देण्यात आले होते , तर रांगोळी स्पर्धेसाठी मतदार राजा जागा हो , मी मतदानाचा हक्क बजावणार आणि संविधान व माझे कर्तव्य हे विषय देण्यात आले होते . या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या . या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पुढील क्रमांक प्राप्त झाले.

**निबंध स्पर्धा -**

१) प्रथम क्रमांक - कु. श्रद्धा संतोष भोपी (FYBA)

२) द्वितीय क्रमांक - कु. ऐश्वर्या राजेंद्र जाधव (SYBA)

३) तृतीय क्रमांक -कु. शीतल सुधीर थोरात (SYBAF)

४) उत्तेजनार्थ - कु. दिव्यल राकेश पाटील (FYBCOM)

**रांगोळी स्पर्धा**

१) प्रथम क्रमांक - कु. श्रद्धा संतोष भोपी (FYBA)

२) द्वितीय क्रमांक - कु. प्राजक्ता प्रवीण अवघडे (FYBA)

३) तृतीय क्रमांक -कु. प्रज्ञा पुंडलिक धोंडे (SYBA)

४) उत्तेजनार्थ - कु. प्रणाली गायकवाड (SYBA)

राज्यशास्त्र व N.S.S.विभाग

# सूर्य नमस्कार कार्यक्रमाचे आयोजन

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात भारत सरकारची ७५ करोड सूर्यनमस्काराची संकल्पना असून त्याचे औचित्य साधून आदर्श महाविद्यालयात शनिवार दि. १२/०२/२०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयाच्या मैदानात सकाळी ८ वाजता सूर्यनमस्काराचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षेकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे कर्मचारी आणि विध्यार्थी मिळून एकूण ३०० सूर्यनमस्कार काढण्यात आले या कार्यक्रमात सर्वानी स्वयं स्फूर्तीने सहभाग घेतला होता.

N. S. S. कार्यक्रम अधिकारी

# सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रम

आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व बदलापूर पूर्व पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हे जनजागृती या विषयावर गुरुवार दि. २४/०२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार मॅडम यांनी तरुण पिढीने जागृकपणे प्रसार माध्यमांचा वापर करून सायबर गुन्हेगारी पासून दूर राहीले पाहिजे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले तर मा. श्री जगदिश सातव सहाय्यक पोलीस आयुक्त अंबरनाथ विभाग यांनी सध्याच्या युगात आपण प्रत्यक्ष जीवनपद्धती ऐवजी ऑनलाईन पद्धतीचा जास्त वापर करतो यावर मत व्यक्त केले. तर सायबर गुन्हेगारीच्या काही प्रत्यक्ष घटनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. श्री धर्मेन्द्र नलावडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात इंस्टाग्राम, फेसबुक, गुगल, मोबाईल, संगणक या साधनांचा वापर जागृकपणे केला पाहिजे असे भाष्य केले. शिवाय ऑनलाईन मोफत सुविधा घेऊ नये, ऑनलाईन पद्धतीने आर्थिक व्यवहार करतांना दक्ष असले पाहिजे व क्रेडीट कार्ड व डेबीट कार्डचा गैरवापर होऊन कशी फसवणूक शकते आणि link click करून व फोटो share करून त्याचा कसा गैरवापर होतो असा अनेक घटनांवर त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रकाश टाकला. भाषणात प्रकाश टाकला. सदर कार्यसमास मा. श्री श्रीकांत सोंडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व मा. स्वाती पेटघर पोलीस निरीक्षक हे देखील उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील ७५ विदयार्थी सहभागी झाले होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आत्माराम बांदल यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ संदीप भेले यांनी मानले.

(NSS) कार्यक्रम अधिकारी